आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१६ जुलै २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारतर्फे येत्या रविवारी सर्वपक्षीय बैठक
- साक्षीदारांच्या चौकशीसाठी पोलीसांच्या अखत्यारीतली जागा न निवडण्याचे केंद्रिय गृह मंत्रालयाचे सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश
- पंढरपुरात उद्याच्या आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज उत्तररात्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा
- बांगलादेशात कोटा सुधारणेविरोधात झालेल्या निदर्शनांत तीन जणांचा मृत्यू, शंभरहून अधिक जखमी

**आणि**

- पुढचे पाच दिवस मध्य महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक आणि केरळात मुसळधार पावसाची शक्यता

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं येत्या रविवारी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरळीत व्हावं यासाठी सत्ताधारी विरोधी पक्षांकडून या बैठकीत सहकार्य मागणार आहेत. येत्या २२ तारखेपासून हे अधिवेशन सुरू होणार आहे. १२ ऑगस्टला त्याची सांगता होईल. २३ जुलै रोजी अर्थमंत्री संसदेत अर्थसंकल्प मांडतील. तिसऱ्या वेळी प्रधानमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर नरेंद्र मोदी यांच्या सरकारचा हा पहिलाच अर्थसंकल्प आहे.

**<><><><><>**

गुन्ह्याचा तपास करताना साक्षीदारांची चौकशी करण्यासाठी पोलीस ठाण्यातली किंवा पोलीस विभागाच्या अखत्यारीतली जागा निवडू नये असं केंद्र सरकारने सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना सांगितलं आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाचे सचिव अजय भल्ला यांनी या संदर्भात सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहलं आहे. पोलीस ठाण्यांनी साक्षीदाराची चौकशी ऑडिओ, व्हिडीओ इलेक्ट्रॉनिक साधनांच्या माध्यमातून करण्यासाठी विशिष्ट जागा ठरवून घ्यावी, असं सरकारनं सांगितलं आहे.

**<><><><><>**

आषाढी एकादशी उद्या साजरी होत आहे. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज पंढरपूर दौऱ्यावर असून, त्यांच्या हस्ते आज उत्तररात्री अडीचच्या सुमाराला श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा केली जाणार आहे.

यानिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा आणि व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली “समन्वय समिती” गठीत करण्यात आली आहे. ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, तसंच सार्वजनिक आरोग्य मंत्री तानाजी सावंत या समितीत सदस्य म्हणून काम पाहणार आहेत.

आषाढीवारी निमित्त राज्यातील अनेक मंत्री उपस्थित राहणार आहेत. यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कुटुंब आणि आरोग्य कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, महसुल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेच्या उपाध्यक्ष नीलम गोऱ्हे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अनेक मंत्री आणि मंत्रालयातले प्रमुख अधिकारी यात्रेसाठी पंढरपूरात दाखल झाले आहेत.

आषाढी वारीसाठी आज मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकातून भाजपाच्या वतीनं नमो एक्स्प्रेस ही गाडी भाविकांना घेऊन पंढरपूरला रवाना झाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या गाडीला झेंडा दाखवला.

<><><><><>

परराष्ट्र मंत्री डॉ एस जयशंकर यांनी आज पोर्ट लुईस इथं मॉरिशसचे प्रधानमंत्री प्रविंद कुमार जुगनाथ यांची भेट घेतली. जयशंकर यांनी भारत-मॉरिशस विशेष आणि कायमस्वरुपी भागीदारी बद्दल चर्चा केली आणि त्याच्या अधिक विस्ताराचं कौतुक केलं. अंतराळ सहकार्य, राष्ट्रीय अभ्यासक्रम संशोधन संस्थेचा विकास, आदी क्षेत्रात झालेल्या करारांचा त्यांनी आढावा घेतला. मॉरिशियस मध्ये राहणाऱ्या सातव्या पिढीतल्या नागरिकांना जयशंकर यांनी परदेशी भारतीय नागरिकत्त्वाच्या कार्डचं वाटप केलं.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायमूर्ती एन कोटीश्र्वर सिंग आणि आर महादेवन यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. न्यायमूर्ती एन कोटीश्र्वर सिंग सध्या जम्मू काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आहेत. तर न्यायमूर्ती आर महादेवन मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आहेत.

<><><><><>

बंगळुरूच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी मेकेडाटू प्रकल्पासाठी तामिळनाडूनं सहकार्य करावं असं आवाहन कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांनी केलं आहे. बेंगळुरू इथं आज कर्नाटक विधानसभा अधिवेशनादरम्यान बातमीदारांशी बोलताना त्यांनी हे आवाहन केलं. या प्रकल्पामुळं तामिळनाडूला देखील पाणी मिळणार आहे. सध्या कावेरी जलनियमन समितीच्या निर्देशानुसार कर्नाटक तामिळनाडूला २० हजार क्युसेक्स इतकं पाणी देत आहे.

मुसळधार पावसानं या प्रकल्प क्षेत्रात भरपूर पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

बांगलादेशात ढाक्यासह विविध शहरांमध्ये आज कोटा सुधारणा आंदोलनाविरोधात झालेल्या निदर्शनांत तीन जण ठार तर शंभरहून अधिक जण जखमी झाले. चट्टोग्राममध्ये कोटा सुधारणा आंदोलक आणि बांगलादेश छात्र लीग आणि जुबो लीगच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या संघर्षात दोन जण ठार झाले. तसंच रंगपूर विद्यापीठाच्या आवारात पोलिस आणि आंदोलकांमध्ये झालेल्या चकमकीत एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. चट्टोग्राम, रंगपूर, राजशाही आणि बांगलादेशातल्या इतर शहरांमध्ये विद्यार्थ्यांनी विविध महामार्गांसह रस्ते रोखल्यानं ढाक्यामधली वाहतूक आज ठप्प झाली.

**<><><><><>**

पुढचे पाच दिवस गोवा, मध्य महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि केरळात मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. तर तेलंगणा, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा आणि तामिळनाडू इथंही मुसळधार पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पूर्व राजस्थान, जम्मू, काश्मीर, लडाख, पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश आणि पश्चिम राजस्थानमध्ये पुढच्या पाच दिवसांत हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

**<><><><><>**

सीबीआय, अर्थात केंद्रीय अन्वेषण संस्थेनं नीट पेपर फुटी प्रकरणी आणखी दोन आरोपींना पाटणा इथून आज अटक केली आहे. हजारीबाग इथल्या राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या कार्यालयातून नीट परीक्षेचा पेपर चोरल्याच्या त्यांच्यावर आरोप आहे. या प्रकरणात आतापर्यंत एकूण 14 आरोपींना अटक केली आहे. सीबीआय आणि विविध राज्याचे पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

**<><><><><>**

केरळमध्ये अग्निशमन दलाच्या जवानांनी आज चित्तूर नदीत अडकलेल्या चार जणांची सुटका केली. पल्लकड जिल्ह्यात चित्तूर नदीत चार जण आंघोळीसाठी गेले होते. दरम्यान, तामिळनाडूच्या आलियार धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाणी सोडण्यात आलं. त्यामुळे पाण्याची पातळी वाढून ते नदीतल्या खडकावर अडकले. अग्निशमन दलाने दोरी आणि जीवरक्षक जॅकेटच्या साहाय्यानं त्यांची सुखरूप सुटका केली.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यात काल रात्री दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत गंभीर जखमी झालेल्या पाच सुरक्षादल जवानांचा आज मृत्यू झाला. यात लष्कराच्या एका अधिकाऱ्याचाही समावेश आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी याबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. प्राणांची आहुती देणाऱ्या या जवानांच्या कुटुंबीयांसोबत देश खंबीरपणे उभा आहे, असं त्यांनी म्हटलं आहे. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनीही या हुतात्म्यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

मुंबई- पुणे महामार्गावर आज सकाळी झालेल्या बस अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला. जखमी झालेल्या ४५ प्रवाशांना कळंबोलीच्या एमजीएम रुग्णालयात

दाखल करण्यात आलं आहे. यापैकी ७ जणांची प्रकृती सुधारल्यानं त्यांना घरी सोडण्यात आलं आहे. आषाढी एकादशीनिमित्त डोंबिवलीहून पंढरपूरला जाणारी बस ट्रॅक्टरला धडकून दरीत कोसळली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज कळंबोलीतल्या एमजीएम रूग्णालयात भेट देऊन रूग्णांची चौकशी केली. सरकारकडून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी पाच लाख रूपयांची मदत, तसंच जखमींच्या उपचाराचा खर्च सरकार करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. ट्रॅक्टरसाठी बंदी असताना महामार्गावर ट्रॅक्टर कसा आला याची चौकशी केली जाणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातल्या बर्न्ट मेमरी च्या पडताळणीसाठी प्रमाण कार्यप्रणाली निवडणूक आयोगानं आज जारी केली. विधानसभा मतदारसंघातल्या कोणत्याही मतदान केंद्रावरच्या EVM ची निवड आणि कोणत्याही मतदान केंद्रावरच्या बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि VVPAT यांना जोडणाऱ्या कोणत्याही मतदान केंद्रावरच्या मतदान यंत्राची जुळणी आणि सरमिसळ यांचा त्यात समावेश आहे. फर्मवेअरमध्ये लपलेल्या कार्यक्षमतांची कोणतीही भीती, आणि शंकांचं निराकरण या तपासणी आणि पडताळणीतून होतं, अशी खात्री निवडणूक आयोगानं व्यक्त केला आहे.

<><><><><>

शिर्डी इथल्या साईबाबा मंदिराला सीआरपीएफ अर्थात केंद्रीय राखीव पोलीस दल किंवा सीआयएफएफ अर्थात केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाची सुरक्षा पुरवण्याबाबत शिफारस करण्यासाठी सात सदस्यीय समिती स्थापन करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. राज्याचे निवृत्त मुख्य सचिव

या समितीचे अध्यक्ष असतील. ३० नोव्हेंबर पर्यंत याबाबतचा गोपनीय अहवाल समितीला न्यायालयात दाखल करावा लागणार आहे.